# उपमुख्य अधिकारी / पणन विभाग,

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई

कक्ष क्र.२४० पहिला मजला, गृहनिर्माण भवन (म्हाडा) कलानगर वांद्रे (पूर्व) मुंबई-५१

---

***जाहिर सुचना***

जा.क्र.उपमुअ/पणन/मुं.मं./कार्या.१५/ २८३५ /२०२१

दिनांक- १५ /०७/२०२१

---

**विषय : मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाद्वारे घेण्यात आलेल्या सोडतीमधील माहे. जाने-२०२० ते माहे. जून-२०२१ च्या कालावधीमध्ये सदनिकेची रक्कम भरण्याचा कालावधी संपुष्ठात आलेल्या लाभार्थींना सदनिकेची विलंब शुल्कासह रक्कम भरण्यास मुदतवाढीबाबत.**

---

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ [म्हाडाचा विभागीय घटक] द्वारे विविध वसाहतीमधील योजनांच्या वाटपासाठी सोडत काढण्यात आली आहे. सद्यास्थिती कोविड-१९ महामारी व शासनाच्या टाळेबंदीमुळे काही लाभार्थींना सदनिकेची रक्कम भरण्यास अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

तरी माहे.जानेवारी-२०२० ते माहे.जून-२०२१ च्या कालावधीमध्ये ज्या लाभार्थींना सदनिकेची रक्कम भरण्यासाठी तात्पुरते देकारपत्र (Provisional Offfer Letter) देण्यात आले आहे. तसेच या कालावधीमधील सदनिकेची रक्कम भरण्याचा कालावधी संपुष्ठात आलेल्या लाभार्थींना तात्पुरत्या देकारपत्रातील अटी, शर्ती व मंडळाद्वारे वेळोवेळी देण्यात आलेलया मुदतवाढीमध्ये देखिल सदनिकेची संपुर्ण रक्कम अदा केलेली नाही अशा लाभार्थींना सदनिकेची संपुर्ण रक्कम दिनांक १८.१०.२०२१ पर्यंत नियमाप्रमाणे विलंब शुल्कांची आकारणी करण्याच्या अधिन राहून अंतिमत: मुदतवाढ देण्यात येत आहे. तद्नंतर लाभार्थींनी केलेल्या कोणत्याही अर्जाची / विनंतीची / तक्रारीची दखल घेतली जाणार नाही यांची कृपया नोंद घ्यावी.

**टिप-कोविड-१९ महामारीमुळे मुंबई महानगर पालिकेने मंडळाच्या काही योजनेमधील सदनिका कोविड विलगीकरणासाठी ताब्यात घेतलेल्या आहेत. अशा योजनेतील लाभार्थींना सदर सुचना लागु राहणार नाही.**

**(मा.उपाध्यक्ष / प्राधिकरण यांचे मान्यतेने)**

**(स्वाक्षरीत)**

**मुख्य अधिकारी,**

**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**

**मुंबई**